**आर.सी.एस. क्र. ५६/२०१६**
***अरूण वि वेणुबाई***
**निशाणी क्र. ५४ वर पुढे**

**प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.२ यांचा सरतपास विधीज्ञ श्री. एच.आय.ताजने यांच्या तर्फे शपथेवर सुरु –**

५. मी दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकूर खरा असून तो मला माझ्या विधीज्ञांनी मराठी भाषेत समजून सांगितल्यानंतर मी त्यावर सही केली आहे. त्यातील मजकूर खरा आहे. शपथपत्र **निशाणी क्र. ५४** वर आहे.

६. आता मला मृत्युपत्राचा लेख क्र. २५३६/२०१५ दाखविण्यात आला. ते मृत्युपत्र मनोहर महादेव इंगोले यांनी माझ्या समक्ष तयार केले होते. त्यावर मनोहर इंगोले यांनी सही व अंगठा केला आहे. तो दस्त माझ्या समक्ष दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करण्यात आला. मी मनोहर इंगोले यांना ओळखतो. कारण ते माझ्या गावचे आहे. त्यावर मी साक्षीदार म्हणून सही व अंगठा केला आहे. त्यावेळी दुसरे साक्षीदार अशोक लक्ष्मण खुजनारे हजर होते. त्यांनी देखील सही व अंगठा केला होता. त्या दस्तातील लेख मनोहर इंगोले यांच्या इच्छे नुसार लिहीला गेला होता. मृत्युपत्रास **नि.क्र.७८** देण्यात येते.

७. आता मला मृत्युपत्राचा लेख क्र. २५३५/२०१५ दाखविण्यात आला. ते मृत्युपत्र मनोहर महादेव इंगोले यांनी माझ्या समक्ष तयार केले होते. त्यावर मनोहर इंगोले यांनी सही व अंगठा केला आहे. तो दस्त माझ्या समक्ष दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी करण्यात आला. त्यावर मी साक्षीदार म्हणून सही व अंगठा केला आहे. त्यावेळी दुसरे साक्षीदार अशोक लक्ष्मण खुजनारे

हजर होते. त्यांनी देखील सही व अंगठा केला होता. त्या दस्तातील लेख मनोहर इंगोले यांच्या इच्छे नुसार लिहीला गेला होता. मृत्युपत्रास **नि.क्र.७९** देण्यात येते.

**सरतपास – संपुर्ण.**

**उलटतपास करीता वादी व त्यांचे विधिज्ञ वारंवार पुकारले असता गैरहजर.**

**करीत उलट तपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

स्थळ – सावनेर
दिनांक २६/०७/२०२३

(एस.आर.भरड)
**सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर,**
सावनेर